महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव
**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र** करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.१२/रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २६ जुलै,२०११

संदर्भ : १) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७
२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम,२००५
३) भारत सरकारचे पत्र क्रमांक J-११०११३/२००९-NREGA, दिनांक ७ जानेवारी,२०१०

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची १९७७ पासून महाराष्ट्रात अंमलबजावणी सुरु झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७ नुसार दोन योजना सुरु होत्या.

I) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना व

II)महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७ कलम ७ (२)(दहा) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना

सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

२. सन २००५ मध्ये केंद्रशासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम लागू केला. सदर अधिनियमांतर्गत राबविण्यात येणा-या योजनेकरिता राज्य शासनास केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळत आहे. केंद्र शासनाने सन २००९ मध्ये अधिनियमामध्ये सुधारणा करुन सदर अधिनियमाचे नाव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अधिनियम,२००५ असे केले आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनांना अशा सुचना दिल्या आहेत की, या अधिनियमांतर्गत अर्थसहाय्य केल्या जाणा-या योजनेस महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व तद्नंतर संबधित राज्याचे नाव असे संबोधण्यात यावे.

३.	याबाबत मंत्रिमंडळाच्या दि. १३ जुलै,२०११ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुढील नामबदल करण्यात येत आहे.

अ) केंद्र शासन अर्थसहाय्यित महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव यापुढे **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र** असे करण्यात येत आहे.

ब) राज्य निधीतून घेण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजना पूर्वीप्रमाणे **रोजगार हमी योजना** या नावाने ओळखण्यात येतील.

४.	तसेच राज्य रोहयो निधीतून जुन्या रोजगार हमी योजनेंतर्गत घेतलेली कामे (उर्वरित कामे, सन २०१२ पर्यंत पूर्ण करावयाची कामे) पूर्वीप्रमाणे रोजगार हमी योजना म्हणून ओळखण्यात येतील. वरील नामबदलाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी (जिल्हा कार्यक्रम समन्वयक), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक) व इतर संबंधित अधिका-यांनी योजनेच्या नामबदलाच्या अनुषंगाने शासकीय अभिलेख, हजेरीपट, फलके याबाबत उचित कार्यवाही करावी. तसेच केंद्राच्या LOGO चा ही वापर करावा. त्याचप्रमाणे आर्थिक लेखाविषयक बाबीही उपरोक्त नामबदलाच्या अनुषंगाने करण्यात येतील याबाबत कटाक्षाने लक्ष द्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून याचा संगणक संकेतांक क्र. २०११०७२६१६२७१९००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो व जलसंधारण)

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव

५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
८) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) १, महाराष्ट्र, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) २, महाराष्ट्र, नागपूर.
१०)महालेखापाल (लेखा परिक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई.
११)महालेखापाल (लेखा परिक्षा) २, महाराष्ट्र, नागपूर.
१२)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४) वित्त विभाग (विनियम)(अर्थसंकल्प) व (व्यय-१).
१५) सर्व विभागीय आयुक्त.
१६) आयुक्त, (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी.
१८) सर्व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
१९) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो).
२०) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो).
२१) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
२२) मुख्य अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) पुणे.
२३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.
२४) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.
२५) प्रधान मुख्य वन संरक्षक , महाराष्ट्र राज्य, नागपूर
२६) संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२७) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२८) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, रोहयो समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.
२९) मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो).
३०) सर्व उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग)
३१) सर्व मंत्रालयीन विभाग.
३२) कक्ष अधिकारी, रोहयो -१, सारसंग्रह
३३) उप संचालक (रोहयो ९ ) यांना संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता अग्रेषित
३४) निवडनस्ती, रोहयो-१०.

-------------------